विधान सभा महाराष्ट्र

आ. सुधीर मुनगंटीवार
अध्यक्ष, भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश

जावक क्रमांक :
प्रति,

दिनांक २१/०८/२०१०

मा. प्रधान मुख्य वनसंरक्षक
म. रा. नागपूर

सप्रेम नमस्कार !

विषयः ताडोबा राष्ट्रीय उद्यानजवळ बांधण्यात येणा-या पर्यटक संकुलाबाबत तक्रार.
संदर्भः माझे आपणास सादर पत्र क्र. 284/जाने/10 दिनांक 15/1/2010

महोदय,

देशविख्यात ताडोबा राष्ट्रीय उद्यानात पर्यटकांना अनेक समस्यांचा आणि गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. दोन वर्षापूर्वी ताडोबाच्या आतील आणि तलावाजवळचे विश्रामगृह पर्यटकांसाठी बंद करण्यात आले. पर्यटकांसाठी पर्यायी व्यवस्था न करताच हा निर्णय घेण्यात आला.

दोन लाखापेक्षा जास्त खर्चाचे काम निविदा काढूनच केले पाहिजे असे नियम आहे, परंतु या नियमाला बगल देत श्री. नंदकुमार मुख्य वनसंरक्षक (वन्य जीव) यांच्या सूचनेवरून नव्या पर्यटन संकुल उभारणीचे काम कोणतीही निविदा न काढता वर्धेच्या ग्रामोपयोगी विज्ञान केंद्राला देण्यात आले आहे. या केंद्रासोबत एका साध्या कागदावर करार करण्यात आला आहे. तीन हप्त्यात या केंद्राच्या उभारणीसाठी एक कोटी रूपये निधी देण्यात आला आहे. हा व्यवहार करताना या केंद्राकडुन कोणतीही सुरक्षा हमी घेण्यात आली नाही. एक वर्षाचा कालावधी लोटुनही या केंद्राने एकाही संकुलाचे बांधकाम पूर्ण केले नाही., अशी माहिती प्राप्त झाली आहे हा. एकूनच प्रकार अतिशय गंभिर आहे.

1. सदर काम निविदा प्रकाशित न करता कोणत्या नियमानुसार देण्यात आले आहे. ?
2. श्री. नंदकुमार मुख्य वनसंरक्षक वन्य जीव यांच्या सूचनेवरून वरील संस्थेला सदर काम देण्यात आला आहे काय. ?
3. विना निविदा हे काम देण्यात आले असल्यास त्याची चौकशी करण्यात आली आहे. काय चौकशीचा निष्कर्ष काय आहे. ?

कार्यालय : सीडी.ओ. ब्लॉक नं.१, वसंतराव भागवत चौक, योगक्षेमसमोर, नरिमन पॉइंट, मुंबई-४०००२०
दूरध्वनी : २२०२२०५०/२२०४८६८७ फॅक्स : २२८५२३०५ सचिव : मोबाईल : ९८२२५६५९२६
चंद्रपूर : भाग्यश्री, गोल बाजार वार्ड, चंद्रपूर-४४२४०१, दूरध्वनी : ऑफिस (०७१७२) २५२५८२, २५६०६९, फॅक्स : २५८८००.
Email : sudhirmungantiwar@yahoo.co.in / ajaydhawane@gmail.com

आ. सुधीर मुनगंटीवार
अध्यक्ष, भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश

जावक क्रमांक :

4. सदर पर्यटन संकुलाचे बांधकाम केव्हापर्यंत होणे अपेक्षित आहे. ?

यासंदर्भात मी आपणास दि. 15/1/2010 रोजी लेखी पत्र सादर केले होते परंतु आपण पत्रोत्तर दिले नाही. आमदारांच्या पत्राला 8 दिवसाच्या आत उत्तर देणे बंधनकारक असल्याचे शासनाचे परिपत्रक आहे. आपणातर्फे वरील विषयाबाबत तातडीने खुलासा न झाल्यास नाईलाजास्तव याविषयासंदर्भात मला आपणा विरूध्द विधानसभेत हक्कभंग मांडावा लागेल.

आपण सदर माहीती मला 8 दिवसाच्या आत कळवावी, ही विनंती.

धन्यवाद !

आपला स्नेहांकित

(सुधीर मुनगंटीवार)

कार्यालय : सीडी.ओ. बॅरॅक नं.१, वसंतराव भागवत चौक, योगक्षेमसमोर, नरिमन पॉइंट, मुंबई-४०००२०
दूरध्वनी : २२०२२०५०/२२०४८६८७ फॅक्स : २२८५२३०५ सचिव : मोबाईल : ९८२२५६५९२६
चंद्रपूर : भाग्यश्री, गोल बाजार वार्ड, चंद्रपूर-४४२४०१. दूरध्वनी : ऑफिस (०७१७२) २५२५८२, २५६०६९, फॅक्स : २५८८००.
Email : sudhirmungantiwar@yahoo.co.in / ajaydhawane@gmail.com